# प्रेस नोट

जा.क्र. वानिशा/वाहतुक नियमन अधिसुचना/२०१७- भंडारा    दिनांक १४/०९/२०१७
४५१

प्रति,

जिल्हा माहीती अधिकारी,
भंडारा.

—०—

भंडारा शहरातील वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करण्याकरीता शहरातील रस्त्यांवर जड वाहनांच्या वाहतुकीस बंदी, एकेरी वाहतुकीचे मार्ग निश्चीत करणे, सम–विषम तारखेस पार्कींग इत्यादी बाबतची अधिसुचना मा. पोलीस अधीक्षक भंडारा यांनी दिनांक ०२/०४/२००७ रोजी जारी केलेली होती.

परंतू वाढती लोकसंख्या, मोटार वाहनांचे वाढते प्रमाण व पर्यायाने मोटार वाहनांचे वाढत्या अपघाताचे प्रमाण व निर्माण झालेल्या वाहतुकींच्या समस्या यावर उपाययोजना करण्यासाठी सदर अधिसुचनेमध्ये कालानुरुप काही बदल किंवा सुधारणा करणे आवश्यक असून त्यानुसार सदर अधिसुचनेमध्ये पुढील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

१) भंडारा शहरात मालाची ने–आण करणा–या अवजड वाहनांना बंदी.

अ) त्रिमुर्ती चौक ते पोष्ट ऑफीस चौक ते गांधी चौक ते शास्त्री चौक पर्यत.
(वेळ सकाळी ०७.०० वा. ते २१.०० वा. पर्यंत अवजड वाहनांना बंदी राहील)

ब) जिल्हा परिषद चौक ते राजीव गांधी चौक ते खामतलाव चौक ते शास्त्री चौक पर्यंत

क) नागपूर नाका ते राजीव गांधी चौक ते खामतलाव चौक ते शास्त्री चौक पर्यंत.

( क्र. ब व क करीता वेळ सकाळी ०७.०० ते १३.०० व १६.०० ते २१.०० वा. पर्यंत अवजड वाहनांना बंदी राहील.)

सदर प्रवेश बंदी दरम्यान आतील मुख्य मार्गावर प्रवेश बंदीचे वेळेपुर्वी जाणारी अवजड वाहने रहदारीचे मार्गावर उभे करुन माल, साहीत्य उतरविणार नाहीत. प्रवेश बंदी पुर्वी प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश करणारी अवजड वाहने ही संबंधीत वाहन मालक किंवा व्यापारी, स्वमालकीचे खाजगी जागेत किंवा दुस–यांचे जागेत संबंधीतांची परवानगी घेवून उभी करतील किंवा प्रवेश बंदीचे वेळेपुर्वी आपली वाहने बाहेर काढून घेतील.

२) एकेरी वाहतुक.

अ) गांधी चौक ते पोष्ट ऑफीस चौकाकडे जाणारा मार्ग सर्व मोटार वाहनांकरीता एकेरी वाहतुक.

ब) गांधी चौक, बॅंक ऑफ इंडिया समोरुन हेडगेवार चौकाकडे जाणा–या सर्व वाहनांकरीता एकेरी वाहतुक.

क) पोष्ट ऑफीस चौक ते मुस्लीम लायब्ररी चौकाकडे जाणा–या सर्व वाहनांकरीता एकेरी वाहतुक.

ड) मुस्लीम लायब्ररी चौक ते शामराव चौकाकडे जाणा–या सर्व वाहनांकरीता एकेरी वाहतुक.

३) दुचाकी वाहनांकरीता पार्कींग व्यवस्था.

अ) रस्त्याचे उजवे बाजूला सम तारखेला ( उदा. २,४,६,८ वैगेरे) – पोष्ट ऑफीस चौक ते गांधी चौक)

ब) रस्त्याचे डावे बाजूला विषम तारखेला ( उदा. १,३,५,७ वैगेरे) – पोष्ट ऑफीस चौक ते गांधी चौक)

क) वरील मार्गावर दिवसा वेळ सकाळी ०८.०० ते रात्रौ २२.०० वाजे दरम्यान सर्व प्रकारचे तीन चाकी व चार चाकी मोटार वाहनांना उभे करण्यास करण्यांस बंदी.

४) **नो पार्कींग –**

- अ) बस स्थानक ते शिवाजी स्टेडियम प्रवेशव्दारापर्यंत व बस स्थानक ते सामान्य रुग्णालय कडे जाणारा रस्त्यापर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- ब) पोष्ट ऑफीस चौक ते मुस्लीम लायब्ररी चौकापर्यंत रस्ता सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- क) शामराव चौक पुर्व–पश्चिम रस्ता चौकाचे दोन्ही बाजूस ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- ड) गांधी चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- इ) शास्त्री चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- फ) मुस्लीम लायब्ररी चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- ग) राजीव गांधी चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- ह) जिल्हा परिषद चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- ई) नागपूर नाका चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- ज) त्रिमुती चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.
- क) खामतलाव चौकातून सर्व बाजूला जाणारे सर्व रस्ते चौकापासून ५० मिटर पर्यंत सर्व मोटार वाहनांकरीता नो पार्कींग.

सन २००७ मध्ये लागु करण्यांत आलेल्या अधिसुचनेमध्ये वरील प्रमाणे बदल प्रस्तावीत असून सदर बदलांस स्थानिक नागरीक, व्यावसाईक, ऑटो रिक्षा चालक–मालक वाहतुकदार संघटना यांचे काही आक्षेप किंवा सुचना असल्यास त्यांनी आपल्या सुचना किंवा आक्षेप लेखी स्वरुपात दिनांक ३०/०९/२०१७ पुर्वी पोलीस निरीक्षक, वाहतुक नियंत्रण शाखा, भंडारा यांचे कार्यालयास आपले पुर्ण नांव, पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांकासह कळवाव्यात असे अवाहन मा. पोलीस अधीक्षक भंडारा यांनी केलेले आहे. त्यानंतर आलेले आक्षेप किंवा सुचनांचा विचार केला जाणार नाही.

SUPERINTENDENT OF POLICE ★ BHANDARA ★ सत्यमेव जयते

पोलीस उपअधीक्षक (गृह)
भंडारा.